नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/०२/२०२५ (सोमवार) दुपार**

## क्रिकेट सट्टा /बेटिंग लावुन जुगार खेळणाऱ्यांवर धाड २ गुन्हे नोंद

## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक २३/०२/२०२५ रोजी भारत विरूध्द पकीस्तान आयसीसी चॅम्पीयन्स ट्रॉफी असल्याने क्रिकेटवर सट्टा बेटींग लावुन जुगार खेळणाऱ्यांवर प्रतिबंध करणेकामी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी ९३ संशयीत आरोपीतांना स्थानबध्द केले होते.तसेच क्रिकेट सट्टा/ बेटिंग करणाऱ्या आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**कारवाई क्र १)** दिनांक २३/०२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, भारत विरूध्द पकीस्तान चॅम्पीयन्स ट्रॉफी असल्याने देवलापार हद्दीत जबलपुर रोडवरील न्यु शेरेपंजाब धाब्याच्या बाजुला ,स्वीफ्ट डिझायर कार मध्ये बसुन ३ ईसम दुबई येथे सुरू असलेल्या आयसीसी चॅम्पीयन्स ट्रॉफी भारत विरूध्द पकीस्तान च्या क्रिकेट सामन्यावर मोबाईल द्वारे लोकांकडुन पैसे घेवुन हार जीतचा जुगार खेळत व खेळवीत आहे. अशा विश्वसनिय माहीतीवरून पोलीस घटनास्थळी पोहचले असता जबलपुर रोडवरील न्यु शेरेपंजाब धाब्याच्या बाजुला स्वीफ्ट डिझायर कार मध्ये ३ ईसम बसुन दिसले. त्यांना बाहेर बोलावुन विचारपुस केली असता **आरोपी—१) अनिकेत गणेश पखिडे , वय २२वर्षे ,रा. देवलापार ,ता.रामटेक, जिल्हा .नागपूर २) मिलिंद रमेश जयस्वाल, वय ४० वर्षे, रा. देवलापार ता रामटेक, जिल्हा नागपूर ३) रितिक विनोद दिवटे, वय २३ वर्षे, रा.वडबा ता. रामटेक जिल्हा नागपूर असे आरोपी मिळुन आले. सदर आरोपतांनी** अँड्रॉइड मोबाईल मध्ये आयडी बनवुन CLIK BET या साईटवरून ,तसेच क्रिकेट गुरू या ॲप चा वापर करून स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी क्रिकेट सट्टयावर ग्राहकाकडुन ऑनलाईन पैसे घेतल्याचे दिसुन आले. तसेच **पाहिजे आरोपी सोनू श्याममनोहर गुप्ता रा.सावनेर यांने आरोपीतांना आयडी ओपन करून**

**दिल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पंचासमक्ष अरोपीतांच्या ताब्यातुन १) ३ मोबाईल किंमती. ३०,०००/— रुपये.२) रोख रक्कम १०,७०० /— रुपये ३) स्विफ्ट डिझायर कार क्रमांक एम एच ३१ सी एस ९९ ७२ किंमत ८,००,०००/— रुपये असा एकूण ८,४०,७००/— रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.**

आरोपी नामे **१) अनिकेत गणेश पखिडे वय २२वर्षे रा. देवलापार ता.रामटेक जिल्हा . नागपूर २) मिलिंद रमेश जयस्वाल वय ४० वर्ष राहणार देवलापार ता रामटेक जिल्हा नागपूर ३) रितिक विनोद दिवटे वय २३ वर्ष रा.वडबा ता. रामटेक जिल्हा नागपूर आणि ४) आरोपी सोनू श्याममनोहर गुप्ता रा.सावनेर** यांच्या विरुद्ध पोलीस स्टेशन देवलापार येथे **कलम ४९ भान्यासं सह कलम १२(अ) म. जू. का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

कारवाई क्रं २) दिनांक २३/०२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्तबातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, एमआयडीसी बोरी येथील बालभारती मैदानात सार्वजनिक ठिकाणी, पार्कींग येथे किया कार मध्ये बसुन प्रविण महाकुलकर हा दुबई येथे सुरू असलेल्या आयसीसी चॅम्पीयन्स ट्रॉफी भारत विरूध्द पकीस्तान च्या क्रिकेट सामन्यावर मोबाईल द्वारे लोकांकडुन पैसे घेवुन हार जीतचा जुगार खेळत व खेळवीत आहे. अशा विश्वसनिय माहीतीवरून पोलीस घटनास्थळी पोहचले असता बालभारती मैदानात पार्कीग मध्ये एक किया कार क्रंमाक एमएच ४० सी एच ३३११ ही दिसुन आली. त्यामध्ये आरोपी नामे प्रवीण सुरेश महाकुलकर, वय ३२ वर्षे, रा. रिधोरा सातगाव हा मिळुन आला. त्याला गाडी बाहेर बोलावुन विचारपुस केली असता अँड्रॉइड मोबाईल आयडी बनवुन parplebook9.com या साईटवरून स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी क्रिकेट सट्टयावर ग्राहकाकडुन ऑनलाईन पैसे घेतल्याचे दिसुन आले.तसेच सदर जुगार हा **पाहिजे आरोपी** सुरज राव, रा. बुटीबोरी याच्या सांगणेवरून खेळवला जात असल्याबाबत माहीती प्राप्त झाली.

**पंचासमक्ष अरोपीच्या ताब्यातुन १) २ मोबाईल किंमती.६५,०००/— रुपये. २) रोख रक्कम ४५०० /— रुपये ३)** किया कार क्रंमाक एमएच ४० सी एच ३३११ **किंमती १०,००,०००/— रुपये असा एकूण १०,६९,५००/— रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.**

आरोपी नामे **१)** प्रवीण सुरेश महाकुलकर वय ३२ रा. रिधोरा सातगाव **३ आणि** ४) **आरोपी** सुरज राव रा. बुटीबोरी यांच्या विरुद्ध पोलीस स्टेशन बोरी येथे **कलम ४९ भान्यासं सह कलम १२(अ) म. जू. का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर